

नेसरी : येथे प्रा. संजय पाटील यांचा सत्कार करताना प्राचार्य एस. जे. कालकुंद्रीकर व अन्य शिक्षक.

# संविधानामुळे नागरिकांचे हक्क सुरक्षित : प्रा. पाटील

**नेसरी :** संविधान हा देशाचा आत्मा असून संविधानामुळे देशातील राज्यकारभार चांगला चालतो. नागरिकांना आपले हक्क व कर्तव्याची जाणीव होते. त्यामुळे प्रत्येकाने संविधानाचा अभ्यास करावा व त्यातील कायदे व नियम जाणून घ्यावेत, असे सांगून संविधानामुळे नागरिकांचे हक्क सुरक्षित राहत असल्याचे प्रतिपादन प्रा. संजय पाटील यांनी केले. नेसरी येथील एस. एस. हायस्कूल व छ. ज्युनिअर कॉलेजमध्ये संविधान सप्ताह व अमृत महोत्सवी वर्ष आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य एस. जे. कालकुंद्रीकर होते. यावेळी उपमुख्याध्यापक शिवाजी पाटील, पवन सूर्यवंशी, ए. बी. कोरी, व्ही. बी. कोळी, के. बी. पाटील, पी. एस. कांबळे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन वाय. व्ही. तरवाळ यांनी तर जगदीश तडवी यांनी आभार मानले.

डी. लोहार यांनी स्वागत केले. यावेळी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. के. आर. माने यांनी आभार मानले.

## एस. एस. हायस्कूलमध्ये संयुक्त कार्यक्रम

**नेसरी :** नेसरी (ता. गडहिंग्लज) येथील एस. एस. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये संविधान सप्ताह व अमृत महोत्सवी वर्ष असा संयुक्त कार्यक्रम झाला. प्राचार्य संजय कालकुंद्रीकर अध्यक्षस्थानी होते. प्रमुख वक्ते प्रा. संजय पाटील यांनी संविधानातील विविध कलमांची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. यावेळी उपमुख्याध्यापक एस. एच. पाटील, पवन सूर्यवंशी, ए. बी. कोरे, के. बी. पाटील, व्ही. बी. कोळी व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. वाय. व्ही. तरवाळ यांनी सूत्रसंचालन केले. जगदीश तडवी यांनी आभार मानले.

## ... नेसरी येथे मिनी बाजार

मिळणार आहे. मोठ्या संस्थांची मानले. संतोष चौगले यांनी केले.

# नेसरी येथे ९ वे बालवैज्ञानिक संमेलन

वार्ताहर
नेसरी

मराठी विज्ञान परिषद गडहिंग्लज, उपकेंद्र नेसरी आयोजित ९ वे बालवैज्ञानिक संमेलन एस. एस. हायस्कूल येथे झाले. अध्यक्षस्थानी अॅड. हेमंत कोलेकर होते.

डॉ. अर्चना कोलेकर यांच्या हस्ते विज्ञान दींडी व संमेलनाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी संमेलनासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. मोहन मद्वाण्णा यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासावा असे सांगून मार्गदर्शन केले. संमेलानातील दुसऱ्या सत्रात विज्ञान गप्पा या कार्यक्रमाअंतर्गत प्रा. ए. एस. शिंदे यांनी जैवतंत्रज्ञान विषयी विद्यार्थ्यांशी हितगुज साधली. माजी नौसैनिक बसाप्पा आरबोळे यानी हॅम रेडीओ दिग्दर्शन व प्रात्यक्षिक करून दाखवले. इकबाल




**नेसरी : येथे बालवैज्ञानिक संमेलनात विज्ञान दींडीचा शुभारंभ करताना डॉ. अर्चना कोलेकर. शेजारी शिक्षक व विद्यार्थी.**

दलवाई यांनी प्रयोगातून विज्ञान कार्यक्रमात विविध प्रयोग करून दाखवले. तसेच शाळेच्या प्रांगणात विविध आरोग्यविषयक पोस्टर प्रदर्शन भरवले होते. प्रास्ताविक प्राचार्य एस. जे. कालकुंद्रीकर व एस. एस. मटकर यांनी केले. एस. एच. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय केला. संमेलन समन्वयक व्ही. बी. कोळी यांनी आभार मानले.

सूत्रसंचालन प्रा. संजय पाटील यांनी केले. सुनिल सुतार यांच्या गीतमंचाने विज्ञान गीत सादर केले.

या संमेलनासाठी आय. टी. नाईक, पी. व्ही. सुर्यवंशी, उदय इंदुलकर, एस. एस.देसाई, व्ही. बी. पुजारी, जे. एस. तडवी, टी. डी. बामणे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# नेसरीतील ईश्वरलिंग मंदिराचा आज जीर्णोद्धार

प्रोत्साहन तर सुरेश धुरे यांचे मार्गदर्शन मिळाले.

## एस. एस. हायस्कूलला शैक्षणिक साहित्यांची भेट

**नेसरी :** येथील एस. एस. हायस्कूल व छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेजला बेंटली सिस्टम पुणे या मल्टिनॅशनल कंपनीकडून २०२४ च्या सीएसआर फंडातून ई-लर्निंग कीट स्वरूपात मदत देण्यात आली. डिजिटल प्रोजेक्ट सेट, संगणक सेट व साऊंड बॉक्स असे एकूण १ लाख १६ हजार इतक्या रकमेचे शैक्षणिक साहित्य प्राप्त झाले. बेंटली सिस्टीमचे राहुल पाटील, रॉयल क्लासेसचे प्रा. युवराज पाटील यांनी यासाठी पाठपुरावा केला. संस्थाध्यक्ष ॲड. हेमंत कोलेकर, सचिव डॉ. अर्चना कोलेकर यांचे विशेष सहकार्य मिळाले. प्राचार्य संजय कालकुंद्रीकर, के. बी. पाटील, संतोष देसाई इत्यादींनी हे साहित्य स्वीकारले.

## छ. शिवाजी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**नेसरी :** येथील छ. शिवाजी ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांशी मेलबोर्न (ऑस्ट्रेलिया) विद्यापीठातील डिझायनिंग इंजिनिअरिंगचा विद्यार्थी आदित्य मटकर याने शैक्षणिक, सांस्कृतिक, नोकरीविषयक संधी या विषयांवर इंग्रजी माध्यमातून संवाद साधला तसेच विविध शंकांचे निरसन केले. परदेशातील शिक्षण, शिष्यवृत्ती, नोकरीच्या संधी या विषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य एस. जे. कालकुंद्रीकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी उपप्राचार्य आय. टी. नाईक, प्रा. एस. एन. पाटील, प्रा. रणजित पाटील, प्रा. डी. व्ही. पाटील, प्रा. पी. ए. पाटील आदी उपस्थित होते. डॉ. संजय खमलट्टी यांनी सूत्रसंचालन केले. एस. एस. नलवडे यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच स्पर्धा परीक्षेकडेही वळावे

वार्ताहर
नेसरी

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच करिअरच्या दृष्टीने स्पर्धा परीक्षांकडे वळावे. तसेच यासाठी आवांतर वाचन होणे गरजेचे आहे, असे मत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक कृष्णा गावडे यांनी छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेज नेसरी येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर बोलताना व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव डॉ. अर्चना कोलेकर होत्या. प्रास्ताविक प्राचार्य ए. डी. लोहार यांनी केले. श्री. गावडे पुढे म्हणाले, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सैन्य, पोलीस, एसआरपी, सीआरपी त्याचबरोबर इतर क्षेत्रात ज्या परीक्षा घेतल्या जातात, त्याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले आणि शिस्तबद्ध पद्धतीने अभ्यास केल्यास नक्की कोणत्याही स्पर्धा परीक्षेत यश मिळू शकते असे मत व्यक्त केले.

सूत्रसंचालन प्रा. संजय पाटील यांनी केले, तर आभार आय. टी. नाईक यांनी मानले. शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी उपस्थित होते.

प्रतिक रेडेकर सार्थक केसरकर

## मधुरा पाटील केंद्रात प्रथम

नेसरी : येथील एस. एस.



मधुरा पाटील

हायस्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला. मधुरा संजय पाटील हिने ९५.६० टक्के गुण मिळवून केंद्रात प्रथम तर प्रतिक श्रीधर रेडेकर (९५.४०) याने द्वितीय, सार्थक संजय केसरकर (९५.४०) याने तृतीय क्रमांक पटकाविला. समिक्षा मधुकर साबळे (९५.४०), सृष्टी राजाराम शिटयाळकर (९४.४०), करण सतीश मुरकुटे (९४.००), श्रुती विठ्ठल मोरे (९३.८०), समिक्षा सुनील सांबरेकर (९३.६०), शर्वरी सुहास गुरव (९३.४०), संस्कार किरण मुरकुटे (९३.४०) यांनी गुणानुक्रमे यश मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षकांचे मार्गदर्शन तर संस्थाध्यक्ष हेमंत कोलेकर, सचिव अर्चना कोलेकर, मुख्याध्यापक ए. डी. लोहार, उपमुख्याध्यापक संजय कालकुंद्रीकर, एस. एच. पाटील यांचे प्रोत्साहन मिळाले.

पालकर, शिवाजी

# दहावी परीक्षेत नेसरीच्या एस. एस. हायस्कूलचे सुयश

**नेसरी :** येथील एस. एस. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी दहावी परीक्षेत उत्तुंग यश प्राप्त केले. मधुरा पाटील (९५.६० टक्के), प्रतीक रेडेकर (९५.४०), सार्थक केसरकर (९५.४०) यांनी यश मिळवले. या हायस्कूलचा व सेमी इंग्रजीचा निकाल १०० टक्के लागला. यशस्वी विद्यार्थ्यांना संस्था अध्यक्ष हेमंत कोलेकर, मुख्याध्यापक ए. डी. लोहार व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.



मधुरा पाटील



प्रतीक रेडेकर



सार्थक केसरकर


आधुनिक कालातील खरा